**वादीतर्फे सा.क्र.२ चा अतिरिक्त सरतपास – श्री. एस. एस. इंजल वकील.**

**३.** आता मला मी दि.२२.३.२०११ रोजी टंकलिखित केलेले विक्री पत्र दाखवले. त्याला **नि. क्र.४३** देण्यात येतो.

**सरतपास पुर्ण.**

**प्रतिवादी क्र. १ तर्फे उलट तपास – श्री. ए. एस. फराकटे, वकील.**

**४**. मी १९९५ पासून दस्त लेखनाचे काम करतो. दस्त लेखनाचा परवाना जिल्हा निबंधकाकडून दिला जातो. माझ्याकडे दस्त लेखनाचा परवाना नाही. मला परवान्याशिवाय दस्त लेखन करता येत नाही याची माहिती नाही. मला मुद्रांक दस्त विकत असल्यामुळे दिवाणी व महसूल न्यायालयातील कामकाजाची माहिती आहे. मी १९९५ पासून सन २०१० पर्यंत दस्त लेखनाचे काम केले आहे. मी त्या काळात जसे ग्राहक येईल तसे दस्त लिहून दिले आहेत. मी त्याबाबत न्यायालयात साक्ष देण्यास आलेलो आहे. त्यावेळी देखील माझ्याकडे परवान्याबाबत विचारणा झाली होती. तरीदेखील मी दस्त लेखनाचा परवाना काढण्याचा विचार केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला लोकांचे खोटे दस्त लिहून देण्याची सवय असल्याने परवाना काढला नाही. हे म्हणणे खरे नाही की, परवाना धारकाला केवळ दु. निबंधकाच्या कार्यालयाच्या आवारात दस्त लेखन करावे लागते.

**५**. मी ब–याच वेळा दु. निबंधकांच्या कार्यालयात गेलेलो आहे. मी तेथे दस्त लेखकांचे परवाने पाहिलेले नाहीत. मुद्रांक विक्रीचा परवाना जिल्हा मुद्रांक अधिकारी देतात. माझ्याकडे मुद्रांक विक्रीचा परवाना असून तो आज सोबत आणलेला नाही. मी तो सादर करण्यास तयार आहे. मी नि.क्र. ४३ च्या दस्तापूर्वी बिगरशेती जमीनीचे दस्त लिहिलेले आहेत. त्याबाबतचे दस्त लिहिण्यापूर्वी ले–आऊट व बिगरशेतीचा आदेश पहावा लागतो याची मला माहिती आहे. मी नि.क्र. ४३ चा दस्त लिहिण्यापूर्वी सदर बाबी तपासल्या होत्या. बिगरशेतीबाबत तहसिल कार्यालयाने आदेश दिलेला होता. नगर रचनाकार विभागाने ले–आऊट मंजूर केलेला होता. सदरचे दोन्ही कागदपत्रे नि.क्र. ४३ च्या दस्ता सोबत जोडलेली आहेत.

**६**. ले–आऊट प्लॉटची मोजणी झाल्याचा नकाशा दस्त लिहिण्यापूर्वी पहावा लागतो. मी

नि.क्र. ४३ चा दस्त लिहिण्यापूर्वी तो पाहिलेला असून तो सोबत जोडलेला आहे. दस्ता सोबत असलेला ले–आऊट नकाशा कायम झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, ले–आऊट नकाशा कायम झाल्यानंतरच प्लॉट विक्रीचे दस्त लिहिता येतात. सदर नकाशा कायम झाल्यानंतर बिगरशेती आदेश देणा–या अधिका–याकडून पुन्हा नव्याने आदेश घ्यावा लागतो. मी नि.क्र. ४३ चा दस्त सदर कागदपत्रे पाहून लिहिलेला असून ती त्या सोबत जोडलेली आहेत.

७. मी सुळगावचा गट क्र. ६० मधील प्लॉटचे इतर दस्त लिहिलेले नाहीत. माझी सदर दस्तातील देणार–घेणार यांची पूर्वी ओळख होती. दस्त लिहिताना पक्षकारांची ओळखपत्रे घेतली जातात. मी सदर दस्त लिहिताना ओळखीचे कागदपत्रे घेतली होती. मी सदर कागदपत्रे नि.क्र. ४३ च्या दस्तासोबत जोडलेली आहेत. मी दस्त लिहिण्यापूर्वी मिळकतीचे दु. निबंधक कार्यालयातुन मुल्यांकन करून घेतले होते. पांडुरंग देसाई याने दस्ताचा मुद्रांक हळदकर यांच्याकडून घेतला होता. पक्षकार माझ्याकडे दुपारी ११.३० ते १२.०० वा. दरम्यान आले होते. त्यांनी ओळखीसाठी दिपक मनोहर हरमळकर आणि भगवान बंडू चव्हाण या दोन लोकांना सोबत आणले होते.

८. सदर दस्त करताना देसाई यांनी लिहून दिलेले वटमुखत्यार व चार बहिणी आलेल्या होत्या. मला त्या बहिणींची नावे सांगता येणार नाहीत. सहा लोकांनी दस्त करून दिला असून एका व्यक्तीने करून घेतलेला आहे. मी दस्तावरती लिहून देणा–या सहा लोकांच्या स्वाक्ष–या घेतल्या नव्हत्या. मी त्यावेळी त्यांचे मुळ वटमुखत्यार पत्र पाहिले होते. ते वटमुखत्यार पत्र पारळे दस्त लेखकाने लिहिलेले होते. मला त्याची तारीख सांगता येणार नाही. मला त्या वटमुखत्यार पत्रामध्ये विक्रीचे अधिकार दिल्याचे माहिती नाही. मी त्यामध्ये विक्रीचे अधिकार असल्याचे पाहिले होते.

९. मी सद्या दस्त टायपिंगचे काम करत नाही. मी मागिल १५ ते २० वर्षापासून काम बंद केले आहे. मी नि.क्र. ४३ चा दस्त स्वतः टाईप केलेला नाही. मला दस्त टाईप करणा–या व्यक्तीचे नाव त्यावर लिहावे लागते याबाबत माहिती नाही. सदर दस्त माझ्या मुलाने टाईप केल्याबाबत त्यावरती स्वाक्षरी केलेली नाही. मी माझ्या शपथपत्रात मुलाने दस्त टाईप केल्याची बाब लिहिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पुर्वी तयार

केलेल्या नि.क्र. ४३ च्या दस्तावरती केवळ स्वाक्षरी केलेली आहे.

**१०**. मला भगवान बंडु चव्हाण हा जमीन खरेदी विक्रीचा व्यवहार करत असल्याचे माहिती नाही. मला तो एजंटचे काम करत असल्याचे माहित नाही. दिपक हरमळकर हे डॉक्टर आहेत. ते माझ्या कार्यालयाच्या पाठीमागिल बाजूस राहतात. त्यांच्या रुग्णालय शहरात आहे. मला त्यांनी बुरूडे गावी घर बांधून ते तेथेच राहत असल्याचे माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या कार्यालया पाठीमागे केवळ हरमळकरांचे आई वडील राहतात. मी दस्त लिहून दिल्यानंतर पक्षकारांसोबत दु.निबंधक कार्यालयात गेलो नव्हतो. माझ्या समोर त्यांच्या मध्ये धनादेश देण्या घेण्याचा व्यवहार झाला होता. तो धनादेश एस.बी.आय. शाखा आजराचा १,०५,०००/– चा होता.

**११**. नि.क्र. ४३ च्या दस्तातील प्लॉटच्या पुर्वेला आजरा गडहिंग्लज रस्ता, पश्चिमेला वसंतराव शिवाजीराव देसाई यांची जमीन, उत्तरेला व दक्षिणेला त्याच मिळकतीतील प्लॉट असून ते विक्री केलेले नव्हते. चतुःसिमा नमुद करताना मिळकत धारकांची नावे लिहावी लागतात.

प्रश्न– लगत मिळकत विक्री झालेली नसल्यास त्याच्या मालकाचे नाव लिहावे लागते ?

उत्तर–मिळकत क्रमांक लिहिलेला असल्याने मालकाचे नाव लिहिण्याची आवश्यकता नाही.

**१२**. मी वर्ग २ ची जमीन वर्ग १ ची करण्याबाबतचा पुणे आयुक्तांचा आदेश पाहिला होता. तो नि.क्र. ४३ च्या दस्तासोबत जोडलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी नार्वेकरांसोबत पुर्वी पासून जुनी मैत्री आहे. मी नार्वेकरांना पुर्वीपासून ओळखतो. माझे व त्यांचे केवळ ओळखीचे संबंध आहेत. माझे व पांडुरंग देसाईचे व्यवसाईक संबंध आहेत. मला नि.क्र. ४३ चा दस्त केव्हा लिहून पूर्ण झाला याबाबत सांगता येणार नाही. मला त्या दिवशी मी आणखीन कोणाचे दस्त केले याबाबत सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, दस्त लेखकाला लिहिलेल्या दस्ताची रजिस्टरला नोंद घ्यावी लागते. हे म्हणणे खरे नाही की, मला दस्ताबाबत कोणतीही माहिती नसताना मी नार्वेकर व देसाई यांच्याशी संगनमत करून खोटा दस्त तयार केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष सदर दस्तावरती लिहून देणार – घेणार व साक्षीदारांनी स्वाक्ष–या केल्या नाहीत. हे म्हणणे खरे

नाही की, मी वादीला मदत करण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**<u>प्रतिवादी क्र. २ तर्फे उलट तपास – एकतर्फा.</u>**

**<u>प्रतिवादी क्र. ३ तर्फे उलट तपास – श्री. डी. डी. आजगेकर, वकील.</u>**

**१३**. मी नि.क्र. ४३ चा दस्त ले–आऊट प्लॅनच्या चतुःसिमेप्रमाणे लिहिलेला आहे. सदर दस्त लिहून झाल्यानंतर वादीने माझ्याकडे चतुःसिमेबाबची तक्रार केलेली नाही.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – १८.१०.२०२५. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA